स्वयंअर्थसहाय्यित शाळा

नमुना नं. २

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क.जिप/शिक्षण/प्राथ/खाप्राशा/स्वयंअशाळा/754/२०
पुणे दिनांक :-17/12/२०२०

प्रति,
अध्यक्ष/सचिव/मुख्यध्यापक,
नुतन विद्या प्रसारक मंडळ संचलित मामासाहेब खांडगे इंग्लीश मेडीयम स्कुल, तळेगाव दाभाडे,ता.मावळ,पुणे

**विषय** : बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०१९ याचा नियम ११ पोटनियम (४)अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.

आपला अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळांची केलेल्या पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी याआधारे,

मी **शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे** दिनांक ०१ एप्रिल २०१९ पासून दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत तीन वर्षांच्या कालवधीसाठी इयत्ता १ ली ते ८ वीच्या वर्गाकरीता नुतन विद्या प्रसारक मंडळ संचलित **मामासाहेब खांडगे इंग्लीश मेडीयम स्कुल, तळेगाव दाभाडे,ता.मावळ,पुणे** या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे :-**

१. मान्यतेचा कालवधी वाढवुन मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यात कोणताही बंधन नसेल.
२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिनियम २००९ जोडपत्र एक आणि महाराष्ट बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ जोडपत्र दोन शाळा पालन करील.
३. शाळांना नजिकच्या दर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% त्या मर्यादेपर्यंत प्रवेश देता येईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणे अनुपालन करण्यात येईल.
४. परीच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ २ नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
५. संस्था शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या मात्या पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म जात किंवा वंश जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नकारता येणार नाही.
७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतुन काढुन टाकण्यात येणार नाही.
   (दोन) कोणत्याही बालकास शारीरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही
   (तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
   (चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.
   (पाच) विकलांग विशेष गरज असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

CHAIRMAN
MAMASAHEB KHANDGE ENGLISH MEDIUM SCHOOL
TALEGAON DABHADE, PUNE-410507

Principal
Mamasaheb Khandge English Medium School
Talegaon Dabhade, Pune - 410 507

(सहा) अधिनियमाच्या कलम २३ १ मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात येईल परंतु आणखी असे की अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४ १ मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकाने शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या स्वत:लस गुंतव घेऊ नये याची सुनिश्चीती शाळा करेल.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासकमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयकमाचे पालन करील.

९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमाणेच शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे पालन करील. मागील तपासनीच्या वेळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलपमाणे होत्या.

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ:- **८0,९४ चौ. फुट**
- एकुण बांधकामचे क्षेत्रफळ:- **२३,६९ चौ. फुट**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ:- **४८,00 चौ. फुट**
- वर्गखोल्यांची संख्या :- २४
- कार्यालयनिभांडार नि मुख्याध्यापकाची खोली :- **0३**
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह आहेत का ?

| | मुले | मुली |
|---|---|---|
| संडास | 0८ | १३ |
| मुतारी | २३ | १४ |

- पिण्याच्या पाण्याची सुविधा ः **पाण्याची टाकी नळ**
- दुपारची जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर ः **लागु नाही.**
- अध्यापन अध्ययन साहित्य खेळ व किडाविषयक सामग्री ग्रंथालय यांची उपलब्धता ः **आहे.**
- वाचनसाहित्य विनासायास उपलब्ध **आहे.** ( पुस्तकसंख्या २६६१ वर्तमानपत्र 0३ नियतकलिके

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहित.

१२. शाळेची इमारत किंवा बांधकाम किंवा किडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कैशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येईल.

१३. शाळा सोसायटी नोंदणी नियम १८६0 (१८६0 चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५0 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्ती, संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरिता किंवा कोणत्याही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेस मिळालेल्या मान्यता सांकेतांक **प्राथ. स्वयंअशाळा/ इं / सी. बी. एस. ई. / / / २0१९-२0** असा आहे. तसेच आपल्या शाळेचा **U-DISE No.27250917133** हा आहे. या कार्यालयाशी कोणत्याही पत्रव्यवहार करताना कृपया नमुद करावा याची नोंद घ्यावी.

१७. मा शिक्षण संचालक जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतणीकरण केल्याची सुनिश्चत करावे.

१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

CHAIRMAN
MAMASAHEB KHANDGE ENGLISH MEDIUM SCHOOL
TALEGAON DABHADE, PUNE-410507

Principal
Mamasaheb Khandge English Medium School
Talegaon Dabhade, Pune - 410 507

शिक्षणाधिकारी (प्राथमिक
पुणे जिल्हा परिषद, पुणे